मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

follow us : /rajdandlive

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३३१ सातारा शनिवार दि.३१ ऑगस्ट २०२४ पाने ४ किंमत ५/-


## मुंबई दूध उत्पादक संघाकडून दरवाढ लागू

**मुंबई :** सध्या देशभरात सर्वाच्या लाडक्या बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरू आहे. अशा सणासुदीच्या काळात गोडाचे पदार्थ बनविण्यासाठी दुधाची अधिक मागणी असते. काही महिन्यांपूर्वीच अनेक दूध कंपन्यांनी दरवाढ केली होती. त्यामुळे ग्राहकांना जोरदार झटका बसला होता. त्यानंतर आता पुन्हा मुंबईत दुधाच्या किंमतीत वाढ होणार असल्याचे चिन्ह दिसून येत आहेत. मुंबई दूध उत्पादक संघाने शहरातील म्हशीच्या दुधाच्या घाऊक किंमतीत वाढ केली आहे. नवे दर हे १ सप्टेंबरपासूनच लागू होणार असल्यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांचे ऐन सणांच्या काळात बजेट बिघडणार आहे.

# पवार,पटोले, ठाकरेंनी ओबीसीमधील मराठा आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी, फडणवीसांचे आवाहन



**मुंबई :** मुंबईत नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार, नाना पटोले आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका करत ओबीसी वर्गात मराठा आरक्षणाच्या संवेदनशील मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट करण्याचे आवाहन दिले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार, नाना पटोले आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका करत ओबीसी वर्गात मराठा आरक्षणाच्या संवेदनशील मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट करण्याचे आवाहन दिले आहे. मुंबईत नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात फडणवीस यांनी महाविकास आघाडी (चत-) सरकारच्या नेत्यांनी या मुद्द्यावरून पळ काढण्याऐवजी मराठा समाजाला स्पष्टता द्यावी, अशी मागणी केली.

फडणवीस यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर त्यांची अस्पष्ट भूमिका ठेवल्याबद्दल टीका केली, त्यांनी मराठा समाजाच्या अपेक्षांशी राजकीय खेळ खेळल्याचा आरोप केला. मराठा समाजाला ओबीसी वर्गात समाविष्ट करण्याच्या त्यांच्या मागणीबाबत तुमची भूमिका कुठे आहे हे जाणून घेण्याचा हक्क आहे, असे फडणवीस म्हणाले, आणि विरोधकांच्या या महत्त्वाच्या मुद्द्याच्या सोडवणुकीसाठी असलेल्या वचनबद्धतेबद्दल शंका उपस्थित केल्या.

**फडणवीसांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश**

आम्ही कारवाई केली मविआने काय केले?

उपमुख्यमंत्र्यांनी भाजपच्या मराठा समाजाला १०% आरक्षण मिळवून देण्याच्या प्रयत्नांचा उल्लेख केला, जरी त्याला कायदेशीर आव्हानांचा सामना करावा लागला होता. तथापि, त्यांनी मविआ च्या नेत्यांकडे लक्ष वेधत त्यांच्या अस्पष्टतेवर प्रश्न उपस्थित केला. आमच्या निर्णयाला कायदेशीर अडथळे आले असतील, परंतु निदान आम्ही ठामपणे कारवाई केली. मविआने काय केले? काहीच नाही, फक्त अनिश्चित आश्वासने आणि रिक्त आश्वासनांच्या मागे लपले, असे फडणवीस म्हणाले, आणि विरोधकांना मराठा समाजाच्या गरजांकडे दुर्लक्ष करणारे म्हणून चित्रित केले.

फडणवीस यांनी शरद पवारांवर विशेषतः टीका केली, ज्यात त्यांनी हा अनुभवी नेत्याने मराठ्यांच्या कल्याणाच्या ऐवजी राजकीय हाताळणीला प्राधान्य दिल्याचा आरोप केला. पवार यांना निःसंदिग्धता दाखवण्याचे कौशल्य आहे, मोठमोठे विधान करूनही ते कोणत्याही गोष्टीला बांधील नाहीत. आता त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लोकांना फसवणे थांबवून त्यांची खरी भूमिका स्पष्ट करावी, असे फडणवीस म्हणाले, असे सुचवित आहे की मविआ नेते आपल्या राजकीय युतीला महत्त्व देतात आणि मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यापेक्षा.

भाजप नेते नाना पटोले आणि उद्धव ठाकरे यांच्यावरही टीका केली, त्यांनी ठाम भूमिका घेण्याचे राजकीय धैर्य नसल्याचा आरोप केला. पटोले मोठ्या गोष्टी बोलतात, पण त्यांचे कृती कुठे आहे? आणि ठाकरे-त्यांना मराठ्यांसाठी उभे राहण्याऐवजी आपल्या खुर्चीला जपण्यात जास्त रस आहे, असे फडणवीस म्हणाले, मविआ नेतृत्वावर आपला आव्हान अधिक तीव्र केले.

मराठा आरक्षणाचा मुद्दा महाराष्ट्राच्या राजकारणात एक महत्त्वाचा मुद्दा राहिलेला असताना, फडणवीस यांचा आक्रमक दृष्टिकोन मविआला बचावावर आणला आहे, ज्यामुळे त्यांनी दीर्घकाळ टाळलेल्या मुद्द्याला सामोरे जाणे भाग पडले आहे. राज्य विधानसभा निवडणुका जवळ येत असताना, फडणवीस यांचे आव्हान एका तीव्र राजकीय संघर्षाला सुरुवात झाले आहे, जिथे मराठा समाजाचे समर्थन निर्णायक ठरू शकते.

# गणेशोत्सवाच्या साहित्याने फुलल्या बाजारपेठा

## मूर्तींसह फुलांचे हार, विजेच्या माळांनी स्टॉल सजले



**पुणे :** अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी शहरातील बाजारपेठा विविध रंगी, विविध प्रकारच्या वस्तूंनी फुलून गेल्या आहेत. मूर्ती, फुलांच्या तसेच विजेच्या माळा, सजावट साहित्यांनी स्टॉल्स सजलेले दिसत आहेत. आपल्या लाडक्या बाप्पांच्या आराशीच्या साहित्य खरेदीसाठी गणेशभक्तांची बाजारपेठेत गर्दी वाढू लागली आहे. मखराचे साहित्य, रंगीबिरंगी विविध प्रकारच्या विद्युत माळा, विद्युत समई, पूजेचे साहित्य ठेवण्यासाठी तबक, आकर्षक नक्षीकाम असलेले पूजेचे साहित्य ठेवण्याचे पात्र, प्लॅस्टिकच्या फुलांचे आकर्षक हार, विविध आकारांची विविधरंगी फुले, अगरबत्ती, धूप, रांगोळीचे छाप, ज्योतीच्या वाती, रांगोळीचे विविध रंग, अस्तर, गणेश भक्तांच्या आवडीनुसार सुंदर, सुबक, आकर्षक व नाविन्यता असलेल्या मूर्ती, उपरणे, चांदीचे मोदक, दूर्वा, कंबरपट्टा, मूषक, चंदनहार अशा प्रकारचे साहित्य बाजरात दाखल झाले आहे. हे साहित्य खरेदी करण्यासाठी भक्तांची गर्दी होऊ लागली आहे.

गुलाबी, पिवळा, लाल रंगाच्या हाराला बाजारात पसंती मिळत आहे. बाजारात या हारांची किंमत १०० रुपयांपासून पुढे आहे. मण्यांचे हार वेगवेगळ्या डिझाईनमध्ये बाजारात उपलब्ध झाल्या असून यांची किंमत ५० ते ५०० रुपयांपर्यंत आहे. पथविक्रेते माळांची शंभर रुपयाला पाच या किमतीत विक्री करत आहेत. बाप्पासाठी आकर्षक आसन विविध आकारानुसार उपलब्ध असून त्याच्या किमती तशा आवाक्यात आहेत. मोत्यांच्या कंठ्या देखील विविध डिझाईनमध्ये उपलब्ध आहेत. मोत्यांच्या कंठ्याप्रमाणे विविध रंगांच्या खड्यांच्या कंठ्या, १ फुटांच्या मूर्तीपासून अगदी मोठ्या मूर्तीपर्यंत मोत्यांच्या कंठ्याचे हार उपलब्ध आहेत.

या उत्सवात नाना प्रकारच्या विविध वस्तूंची खरेदी विक्री होते. उत्सव काळातील शहरातील मोठी बाजारपेठ असून त्यामध्ये करोडो रुपयांची उलाढाल होत असते. या काळामध्ये शहरालगतच्या परिसरासह देशभरातून विविध ठिकाणचे विक्रेते येथे माल घेऊन येत असतात.

### राज्याबाहेरील विक्रेतेही आघाडीवर

**महाराष्ट्र बाहेरून देखील अनेक पथविक्रेते उत्सवाचे साहित्य विकण्यासाठी शहरात दाखल झाले आहेत. ते प्रामुख्याने प्लास्टिक फुलांच्या माळा, मोरपंख, कापड, रंग, विद्युत माळा या साहित्याची विक्री करत आहेत.**

**गणपती बाप्पासाठी रुद्राक्ष, सोनेरी मण्यांचे हार, लाल-पिवळ्या गोंड्याचे हार, मोत्यांचे हार आणि सॅटन रिबनपासून बनलेले हार तसेच विविध खड्यांच्या सोंडपट्ट्या, हातातील तोडे, कानांच्या पाळ्यांमध्ये घालायचे दागिने, जान्हवे या वस्तू गणेश भक्तांसाठी खास आकर्षण ठरत आहेत.**

# राजकोट पुतळा प्रकरणावरुन पंतप्रधान मोदींची माफी



**मुंबई :** राज्यामध्ये सध्या राजकोट प्रकरणावरुन वातावरण गरम आहे. मालवणमधील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात आला होता. अवघ्या ८ महिन्यांपूर्वी या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले होते. मात्र नौदलाकडून उभारण्यात आलेला हा पुतळा कोसळला. त्यामुळे राज्यातील शिवप्रेमींनी तीव्र रोष व्यक्त करत नाराजी व्यक्त केली. या प्रकरणामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागितली आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या मुंबई दौऱ्यावर आहेत. मोदींच्या हस्ते त्यांचा ड्रीम प्रोजक्ट मानल्या जाणाऱ्या वाढवण बंदराचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी भाषणामध्ये नरेंद्र मोदी यांनी राजकोट किल्ल्यावर घडलेल्या प्रसंगाबद्दल भरसभेमध्ये माफी मागितली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची माफी मागितली आहे. मोदी म्हणाले की, सिंधूदुर्गामध्ये जे झालं ते वाईट झालं. माझ्यासाठी आणि माझ्या साथीदारांसाठी छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त नाव नाही. शिवाजी महाराज हे आमचे आराध्य दैवत आहे. सिंधूदुर्गातील प्रकरणामुळे मी आज नतमस्तक होऊन छत्रपती शिवाजी महाराज यांची चरणावर डोके ठेवून माफी मागतो. आमचे संस्कार वेगळे आहेत.

आम्ही अशी लोकं नाहीत जी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अर्वाच्च भाषेत बोलणारे आम्ही नाहीत. देशभक्तांच्या भावना पायदळी तुडवणारे आणि अपमान करणारे आम्ही नाहीत,अशा भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केल्या. तसेच अप्रत्यक्षपणे काँग्रेस पक्षाला खडेबोल सुनावले आहेत.

# बदलापूरनंतर कल्याणमध्ये पुन्हा दोन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

**कल्याण:** बदलापूर बाल अत्याचाराची घटना अद्याप ताजी असतानाच आता कल्याणमधून पुन्हा धक्कादायक बातमी समोर आली आहे. कल्याणमध्ये अंगणात खेळणाऱ्या दोन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे. कल्याणमधील टिटवाळा दहागाव परिसरात हा प्रकार उघडकीस आला आहे. मुलगी रडत घरी आली असता आई वडिलांनी विचारपूस केल्यावर मुलीने घडला प्रकार सांगितला. या प्रकरणी टिटवाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कल्याण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित चिमुकली शुक्रवारी दुपारच्या सुमारास घराबाहेर खेळत असताना एक माणूस त्याठिकाणी आला. त्याने मुलीला निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. अत्याचारानंतर त्याने चिमुकलीला पुन्हा घराबाहेर सोडले आणि निघून गेला. मुलीला वेदना असह्य झाल्याने ती रडत रडतच घरी आली. आई वडिलांनी तिला विचारण्याचा प्रयत्न केला पण तिला काही सांगता आले नाही. तिला काही दुखापत तर झाली नसेल ना या विचाराने आई वडिलांनी तिची पाहणी केली असता हा घडलेला प्रकार त्यांच्या लक्षात आला. त्यानंतर आई वडिलांनी तातडीने पोलिसात धाव घेऊन तक्रार दाखली केली, पोलिसांनी गुन्हा नोंद करून घेतला. काही तासातच आरोपीला अटकही करण्यात आली.

# 'आता हे विधानसभेत होणार नाही; निवडणूक प्रचाराबाबत खासदार श्रीकांत शिंदे यांचे सूचक वक्तव्य



दौऱ्याबाबत श्रीकांत शिंदे

**नाशिक :** राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूका होणार आहे. त्यासाठी सर्व पक्षांची जोरदार तयारी सुरु आहे. महायुतीसह महाविकास आघाडी कामाला लागली असून प्रचाराची आखणी केली आहे. अद्याप निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केलेला नसला तरी देखील प्रचारा धुराळा उडाला आहे. नुकतीच काही महिन्यापूर्वी लोकसभा निवडणूका पार पडला. यावेळी महायुतीला राज्यातून अपेक्षित असे यश मिळाले नाही. त्यामुळे महायुती विधानसभेला कंबर कसून तयारीला लागली आहे. दरम्यान, खासदार श्रीकांत शिंदे यांनी महाविकास आघाडीवर निशाणा साधला आहे. लोकसभेत गैरसमज पसरवून विरोधकांनी लोकांची मतं घेतली, ते आता विधानसभेत होणार नाही, असे विधान श्रीकांत शिंदे यांनी केले आहे.

खासदार श्रीकांत शिंदे हे नाशिक दौऱ्यावर होते. आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा दौरा केला. यावेळी नाशिकच्या विधानसभा मतदारसंघाचा त्यांनी आढावा घेतला. नाशिक दौऱ्याबाबत श्रीकांत शिंदे म्हणाले, नाशिकच्या या दौऱ्याला कालपासून सुरुवात झाली आहे. येणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने तयारी सुरू आहे. नाशिक जिल्ह्यातील मतदातसंघाचा आढावा आज घेतला. योजना जाहीर झाल्यानंतर लाभार्थींना काही अडचणी येत आहेत का याबाबत देखील आढावा घेतला. लाडकी बहीण योजनेबाबत माहिती घेतली. कोण कुठल्या जागेवर निवडणूक लढतील यावर निर्णय वरिष्ठ पातळीवर होईल.



### रस्ता रुंदीकरणाचे काम अतिशय धीम्या गतीने..

**सातारा शहरातील छत्रपती शाहू क्रीडा संकुल ते जुन्या आरटीओ रस्त्याचे रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे .या परिसरातील अनेक इमारती तसेच बंगल्यांच्या संरक्षक भिंती, रुंदीकरणांमध्ये पाडून टाकून त्या आतील बाजूस घेऊन तेथे नवीन संरक्षक भिंती ही बांधण्यात आले आहेत. मात्र या रस्त्याचे रुंदीकरण तसेच रस्त्याच्या बाजूला असणारी गटार व्यवस्था आणि अनेक आरोग्य सुविधांची कामे अर्धवट असल्यामुळे हा रस्ता असून तसेच रुंदीकरण होऊन वापरा योग्य नाही .या रस्त्यात असलेला कणसे हॉस्पिटलचा बस स्टॉप हा सध्या रस्त्याच्या मधोमध आल्याचे दिसून येते. त्यामुळे हे काम तातडीने संबंधित विभागाने पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी सुयोग्य बनवावा अशी मागणी परिसरातील नागरिक तसेच वाहन चालक करत आहेत. फोटो ..(अतुल देशपांडे ,सातारा.)**

# वाढवण बंदरासाठी केंद्राकडून ७६ हजार कोटींची तरतूद



**मुंबई :** वाढवण बंदर भूमिपूजन सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी पालघर जिल्ह्यातील वाढवणमध्ये दाखल झाले होते.. या वाढवण बंदराच्या भूमिपूजन सोहळ्यात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, वाढवण बंदरासाठी केंद्राकडून ७६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी (३० ऑगस्ट) महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाढवण बंदराचा पायाभरणी कार्यक्रम पार पडत आहे. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढवण बंदर महाराष्ट्राच्या प्रगतीचं शिखर ठरेल, असे म्हणत हा प्रकल्प गेमचेंजर ठरणार असल्याचे म्हटले आहे. या प्रकल्पासाठी एकूण ७६,००० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांची ही उपस्थिती होती. यावेळी आपल्या भाषणात एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील कोस्टल रोडबाबत मोठी घोषणा केली.

तसेच वाढवण बंदर भूमिपूजन सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी पालघर जिल्ह्यातील वाढवणमध्ये दाखल झाले आहेत. या वाढवण बंदराच्या भूमिपूजन सोहळ्यात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, वाढवण बंदरासाठी केंद्राकडून ७६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

कोस्टल रोड विरार ते पालघरपर्यंत आणणार

देशातील पहिल्या दहा बंदरात भारताचा समावेश होईल. जगाच्या नकाशावर डहाणू पालघरचा ही समावेश असणार आहे. ही भारतासाठी अभिमानाची बाब आहे. या बंदरामुळे आयात-निर्यातीला चालना मिळेल. देशात कंटेनर हाताळण्याची क्षमता वाढेल. भारताने जागतिक व्यापारात प्रवेश केला आहे. १२ लाख अधिक रोजगार उपलब्ध होणार आहे. आदिवासींना रोजगार मिळेल. स्थानिक लोकांना विशेष प्रशिक्षण देणारे ३० कार्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. मच्छिमार आणि स्थानिक लोकांच्या हिताची काळजी घेतली जाईल. मोदी नेहमीच असे प्रकल्प आखतात. यामध्ये स्थानिकांना न्याय मिळाला आहे.

शिवाजी महाराजांनी ३५० वर्षांपूर्वी सागरी मार्गांचे महत्त्व ओळखले होते. त्यामुळे महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आम्ही काम करतो. अटल सेतू कोस्टल रोडला जोडलेला आहे. कोस्टल रोडचे विरार ते पालघरपर्यंत विस्तार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पालघरला विमानतळ केल्याबद्दल पंतप्रधानांना अभिमान वाटेल. १००० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. रोजगार निर्मिती होईल. मुंबईला जागतिक फिनटेक हब बनवण्यासाठी काम करेल. अशी घोषणा मोदींनी केली आहे. २०२६ पर्यंत भारताचे ३ ट्रिलियन रुपयांचे उद्दिष्ट साध्य करण्यात महाराष्ट्र महत्त्वाची भूमिका बजावेल, असे एकनाथ शिंदेंनी सांगितले.

# मुंबई लोकलवरचा ताण हलका होणार

## १२ मार्गिकांच्या अद्ययावतीकरणासाठी हजारो कोटींचा निधी मंजूर



मुंबई : लोकल यंत्रणा अपग्रेड करण्याचे प्रयत्न सुरू झाले असून एकाच वेळी बारा महत्त्वाच्या प्रकल्पांना मंजुरी देत केंद्र सरकारने रेल्वे प्रशासनाला निधी दिला आहे. मुंबई लोकलच्या बारा प्रकल्पांचे काम एकत्रितरित्या सुरू होणार असून पुढच्या तीन वर्षात प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या प्रकल्पांमुळे मुंबई लोकलवर असणारा ताण कमी होईल असे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचा दावा आहे.

मुंबई लोकल हा मुंबईचा अविभाज्य भाग आहे. मात्र प्रत्येक दिवशी वाढणारी गर्दी आणि अपुरी पडणारी लोकल यंत्रणा यामुळे प्रवाशांचे मृत्यू आणि सतत होणारे बिघाड या मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. दररोज ७५ लाख प्रवासी मुंबई लोकलने प्रवास करतात. त्यासाठी दरारोज ३,२०० पेक्षा अधिक लोकल चालवण्यात येतात. पण या देखील अपुऱ्या पडत असल्याने यातून मार्ग काढण्यासाठी केंद्र सरकारने काही महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांना मान्यता देऊन निधी देखील मंजूर केला आहे.

अपग्रेड होणारे प्रकल्प कोणते?

१. सीएसएमटी ते कुर्ला पाचवी आणि सहावी मार्गिका - ८९१ कोटी रुपये. यातील कुर्ला ते परेल हा पहिला टप्पा पुढील वर्षी पूर्ण होणार.

२. मुंबई सेंट्रल ते बोरिवली ६ वी मार्गिका - ९१९ कोटी ३० किमी, यातील खार ते गोरेगाव आधीच सुरू झाला आहे.

३. हार्बर मार्गाचे गोरेगाव ते बोरिवलीपर्यंत विस्तारीकरण - ८२६ कोटी

४. बोरिवली ते विरार पाचवी आणि सहावी मार्गिका (२६ किमी ) २१८५ कोटी

५. विरार ते डहाणू तिसरी आणि चौथी मार्गिका (६४ किमी ) ३५८७ कोटी

६. पनवेल ते कर्जत नवीन उपनगरीय कॉरिडॉर (२९.६ किमी ) २७८२ कोटी

७. ऐरोली ते कळवा उन्नत मार्गिका - ४७६ कोटी

८. कल्याण ते आसनगाव चौथी मार्गिका (३२ किमी) १७५९ कोटी

९. कल्याण ते बदलापूर तिसरी आणि चौथी मार्गिका (१४ किमी) १५१० कोटी

१०. कल्याण ते कसारा तिसरी मार्गिका (६७ किमी) ७९२ कोटी

११. नायगाव ते जुचंद्र (६ किमी ) १७६ कोटी

# ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरणासाठी १५ सप्टेंबरपर्यत मुदत

मुंबई : ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या वाहन चालकांनी मानवी स्वरूपात अनुज्ञप्ती प्राप्त केली आहे. अशा वाहन चालकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यत अनुज्ञप्तीचे (ड्रायव्हींग लायसन्स) संगणक प्रणालीद्वारे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर यांनी केले आहे.

१५ सप्टेंबरनंतर मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण केले जाणार नाही याची अनुज्ञप्ती धारकांनी नोंद घ्यावी. मुंबई (मध्य) ताडदेव येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) परिसरात कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, आय ॲण्ड सी सेंटर, वाहन चालक प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम होणार आहे. या कार्यालयाकडून नोव्हेंबर २००६ पूर्वी जारी करण्यात आलेल्या सर्व अनुज्ञप्ती धारकांना अनुज्ञप्ती मानवी स्वरूपातच आहे. अशा अनुज्ञप्ती धारकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यत या कार्यालयामध्ये येऊन आपले अनुज्ञप्तीचे संगणक प्रणालीमध्ये बॅकलॉग करून घ्यावे. व मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्माट कार्डमध्ये रूपांतरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

# विसर्जन मिरवणुकीबाबत 'दगडूशेठ हलवाई' ट्रस्टचा मोठा निर्णय



**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या 'श्री'च्या मुर्तीची प्रतिष्ठापना कर्नाटक हुमनाबाद येथील श्री दत्त सांप्रदायाचे श्री ज्ञानराज महाराज माणिकप्रभू यांच्या हस्ते होणार आहे. तर गेल्यावर्षीप्रमाणे यंदा विसर्जन मिरवणुकीत ट्रस्टचा रथ दुपारी चार वाजता सहभागी होणार आहे. यंदा गणेशोत्सवात हिमाचल प्रदेशमधील जटोली शिवमंदिराची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. गणेश चतुर्थीला प्राणप्रतिष्ठापनेपूर्वी सकाळी ८.३० वा. मुख्य मंदिरापासून सिंह रथातून श्रीं ची आगमन मिरवणूक निघेल. यंदा ट्रस्टकडून जटोली शिवमंदीराची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे.

### आशियातील सर्वात उंच शिवमंदिर

आशियातील सर्वात उंच शिवमंदिर म्हणून जटोली मंदिर ओळखले जाते. या मंदिराच्या प्रतिकृतीचा आकार १२५ फूट लांब, ५० फूट रंद आणि १०० फूट उंच असणार आहे. मंदिराची प्रतिकृती फायबर मध्ये उभारण्यात येत असून त्यावर रंगकाम करण्यात आले आहे. मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रीं चे दर्शन घेता येईल. कलादिग्दर्शक अमन विधाते यांनी मंदिराचे काम, विद्युतरोषणाइचे काम वाईकर बंधू, मंडपव्यवस्था काळे मांडववाले यांनी केली आहे.

### यंदाची प्रतिकृती असणार खास

येत्या ७ सप्टेंबर रोजी आपल्या लाडक्या बाप्पाचे आगमन घरोघरी होणार आहे. सणासुदीच्या निमित्ताने बाजारपेठा देखील सजल्या आहेत. पुण्यातील गणशोत्सवाला मोठी परंपरा आहे. पुणे शहरातील गणपती बाप्पाची विसर्जन मिरवणूक हे भक्तांचे मोठे आकर्षण आहे. मात्र अनेकदा ही विसर्जन मिरवणूक लांबते. त्यामुळे यंदाच्या वर्षी मिरवणूक वेळेत होण्यासाठी शश्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने एक मोठा निर्णय घेतला आहे. यंदादेखील मागील वर्षीप्रमाणे दुपारी ४ वाजता मिरवणुकीत ट्रस्टने सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. अनंत चतुर्दशीला (दि. १७) दुपारी चार वाजता श्रींची वैभवशाली सांगता मिरवणूक श्री उमांगमलज रथातून निघणार आहे. रथापुढे दोन बॅण्ड पथक आणि एक ढोल ताशा पथक असेल. पोलिस प्रशासनाने विसर्जन मार्गावर उभे असलेल्या ढोल ताशा पथकांना मिरवणुकीत सहभागी होण्यापासून रोखले पाहिजे असे रासने यांनी नमूद केले.

# मनसे कडून शरद बुट्टे पाटलांचा सन्मान संपन्न

**राजगुरूनगर (वा.) :** सह्याद्रीच्या रांगेत लपलेलं निसर्गसौंदर्य वांद्रे पर्यटन स्थळाच्या रूपाने विकसित केल्याबद्दल आणि पर्यटकांची त्याला प्रचंड पसंती मिळाल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी, या पर्यटन स्थळाच्या विकासासाठी काम करणारे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील यांचा आज त्यांच्या कार्यालयात जाऊन सन्मान केला. शाल श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन हा सन्मान करण्यात आला.

एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्यांनी दुसऱ्या राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा चांगल्या कामाबद्दल सन्मान करणे हे पहिल्यांदाच घडले आहे. एरवी एकमेकांवरती टोकाची टीका करणाऱ्या खेड तालुक्याच्या सार्वजनिक जीवनासाठी हे एक सकारात्मक उदाहरण आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष समीर थीगळे उपाध्यक्ष मंगेश सावंत, खेड तालुका अध्यक्ष संदीप पवार, राजगुरुनगर शहर अध्यक्ष सोपान डुंबरे, चाकण शहराचे अध्यक्ष महेश शिरोळे यांचे सह कृष्णा शिंदे, सोमनाथ तरडे, ऋषिकेश पवार, अनिल शिंदे, जय लोखंडे



आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना समीर थिगळे म्हणाले की, दोन वर्षांपूर्वी शरद बुट्टे पाटील यांनी त्यांच्याबरोबर वांद्रे परिसरात गेल्यानंतर या पर्यटन विकासाबद्दल आपले मत मांडले होते. आणि थोड्याच दिवसात प्रत्यक्ष कृती करून वांद्रे सारख्या निसर्गसंपन्न गावामध्ये पढरवाडी पाझर तलावाच्या उपयोग करून भुशी डॅमच्या धर्तीवर निर्माण केलेले पर्यटन स्थळ पर्यटकांच्या प्रचंड पसंतीस आले असून हजारो पर्यटकांनी तिथे भेट दिल्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी याठिकाणी निर्माण झाल्या आहेत. हे काम निश्चितच कौतुकास्पद असून खेड तालुक्याच्या पर्यटनला दिशा देणारे असल्यामुळे आम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने त्यांचा सन्मान करत आहोत.

वांद्रे - भीमाशंकर ट्रेक वन खात्याच्या माध्यमातून नियोजन पूर्वक पुढे आणल्यास या भागातील पर्यटन मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे असेही त्यांनी सांगितले.

विकासाची दूरदृष्टी, पर्यटना बद्दलच्या कल्पना आणि माझे प्रशासकीय ज्ञान एकत्र आणून तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि आमच्या सर्व जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने आम्ही पढरवाडी पर्यटन स्थळ विकसित केले असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केलेला सत्कार अधिक काम करण्याचे प्रोत्साहन देतो. समीर थिगळे यांच्याकडे देखील पर्यटनासंबंधी अनेक चांगल्या कल्पना आणि सूचना असून त्यांच्यासह खेड तालुक्यातील या क्षेत्रातील जाणकार व आवड असणाऱ्या अनेकांना बरोबर घेऊन भविष्यामध्ये खेड तालुक्यात पर्यटन वाढण्यासाठी विविध पातळीवर आम्ही प्रयत्न करणार आहोत.

सर्वांनी एकत्र येऊन हे काम करणे आवश्यक असून सर्वपक्षीय नेते, लोकप्रतिनिधी, अधिकारी, पत्रकार पर्यटनाच्या आवड असणाऱ्या संस्थां आणि व्यक्ती, फोटोग्राफर, रीलस्टार यांना बरोबर घेऊन यापुढे काम करणार आहोत असे शरद बुट्टे पाटील यावेळी म्हणाले.

# दौंड येथे बौद्ध धम्माचे विधिकार यांचे घरात शत चंडिका यज्ञ, होम हवन पुजा विधी

## आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी केला निषेध

**दौंड :** दौंड येथे बौद्ध धम्माचे विधिकार आणखी बौद्धांचारी यांनी आपल्या नव्याने बांधलेल्या अलिशान बंगल्याचे वास्तु शांती निमित्तान शतचंडिका यज्ञ , होम हवन विधी आणि ब्राम्हण पुजारी बोलावुन सलग चार दिवस विधी केल्याचं स्पष्ट पुढे आल्याने बौद्ध धर्मिय समाजात प्रचंड खळबळ उडाली असून या प्रकाराचा जाहिर निषेध करण्यात आला आहे.



या बाबत दौंड येथील आंबेडकरी चळवळीतील प्रमुख कार्यकर्त्यांनी दौंड ठाण्यात लेखी निवेदन देवून जाहिर निषेध व्यक्त केला

याबाबत रिपब्लीकन जेष्ठ नेते नागसेन धेंडे आणि भारत सरोदे यांनी दिलेली माहिती अशी, दौंड येथील एक प्रमुख बौद्धां चार्य, बौद्ध धम्माचे विधिकार साहेबराव पोळ यांनी आपल्या नव्याने बांधलेल्या अलिशान बंगल्याचे वास्तु शांती निमित्तान शतचंडिका यज्ञ, होमहवन आणि पुजा अर्चा विधी सलग चार दिवस ब्राम्हण पुजारी बोलावुन केला आहे. हे सर्व बौद्ध धम्माचे विधिकार म्हणुन काम करुन समाजात आदराचे स्थान असलेल्या पोळ यांनी बौद्ध धम्माचे विरुद्ध वर्तन केले आहे. या त्यांच्या बौद्ध धम्माचे विरुद्ध वर्तन केल्याने दौंड शहर व तालुक्यात प्रचंड संताप व्यक्त होत असुन त्याचं निषेध करण्यात येत आहे.

तरीही पोळ यांनी त्यांना भावेल त्या धम्माचे आचरण करावे. संविधानाने त्यांना तसा अधिकार दिलेला आहे.

परंतु या पूढे त्यांनी बौद्ध धम्माचे वर्षा वास, बौद्ध धम्माचे लग्न विधि, बौद्ध धम्माची शिकवण या आणी हाअन्य कोणत्याही प्रकारची कामे करु नयेत. अशी कामे केल्याचे दिसून आले तर आम्ही त्याचा प्रतीकार करु. असा स्पष्ट इशारा लेखी निवेदनाद्वारे पोळ यांना देण्यात आले आहे.

बौद्ध धर्मिय पोळ यांनी हा बौद्ध धम्माचे विरुद्ध विधी करताना स्वजातीय बांधवांना अजिबात हा विधी कळु नये. यासाठी अतिशय काळजीपुर्वक खबरदारी व दक्षता घेतली होती. बंगल्यालयाच गेट टाळे लावुन घरातील लोक सोडल्यास अन्य लोकांस आत येण्यास सक्त मनाई केली होती.तीन दिवस विधी चालु होता. चवथ्या दिवशी हि बाब बाहेर आली. कार्यकर्ते कंपाऊंड वरुन उड्या मारुन बंगल्यात घुसले.व सर्व प्रकार बाहेर आला.

### POP गणेशमूर्तींवर तूर्तास बंदी?

गणेशोत्सवाआधी मुंबई उच्च न्यायालयाने एक मोठा निर्णय घेतला असून यंदाच्या गणेशोत्वात प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी नसणार आहे. मात्र सरकारला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत.

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे गणेशोत्सव पर्यावरणपूरक आणि आनंददायी व्हावा याकरिता सर्वत्र ठिकाणी प्रयत्न सुरु आहे. तर दुसरीकडे साल २०२० पासूनच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती बनवण्यास बंदी घातली आहे. असं असताना देखील मागील चार वर्षांत त्याची पूर्ण अंमलबजावणीच झाली नसल्याने आणि अजूनही तशा मूर्ती बनवल्या जात असल्याने मुंबई हायकोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. याचपार्श्वभूमीवर मुंबई हायकोर्टाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे.

कोणत्याही पीओपी गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करायची नाही, अशी अट सार्वजनिक गणेशोत्सल मंडळांना घाला, असे निर्देश मुंबई उच्च न्यायलयाने मुंबईसह राज्यातील सर्व महापालिकांना दिले आहेत. पीओपी गणेशमूर्तींना बंदीच्या प्रश्नावर हायकोर्टात पुन्हा सुनावणी पाड पडली.

## स्वाभिमानी रिपब्लिकन महासभा संलग्न रिपब्लिकन कष्टकरी शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची

# तहसीलदार, खेड यांनी घेतली दखल

**राजगुरूनगर :** स्वाभिमानी रिपब्लिकन महासभा संलग्न रिपब्लिकन कष्टकरी शेतकरी संघटनेच्या वतीने गुरुवार (दि. २९) रोजी तहसील कार्यालय खेड येथे संघटनेचे प्रदेशाध्यक्ष हरेश देखणे यांच्या प्रमुख मार्गदर्शनामध्ये विविध मागण्यांसाठी जाहीर धरणे आंदोलन करण्यात आले होते. २००६ च्या दप्तर दिरंगाई कायद्याची अंमलबजावणी झालीच पाहिजे, खेड आगारात नवीन एसटी ची संख्या वाढलीच पाहिजे, साईड पट्ट्यांसह खड्डे मुक्त रस्ते झालेच पाहिजे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक झालेच पाहिजे, खेड ते पुणे स्टेशन पर्यंत थेट बस सेवा उपलब्ध करून दिलीच पाहिजे, आमच्या मागण्या मान्य करा नाहीतर खुर्च्या खाली करा. इत्यादी घोषणांनी तहसील कार्यालय परिसर दुमदुमून गेले.

यावेळी हरेश देखणे, किसन गोपाळे,



रजाक शेख, तुषार गायकवाड, स्वप्निल गायकवाड, विकास शिंदे, इम्रान शेख, गगन भरारी अकॅडमीचे वंजारी सर, हेमंत विरकर इत्यादींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी आंदोलकांची खेडच्या तहसीलदार ज्योती देवरे यांनी भेट घेतली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे मागणी केली असता. तहसीलदार यांनी तात्काळ ती मान्य करत उद्या (दि. ३०) रोजी स्वाभिमानी रिपब्लिकन महासभाचे पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांच्या बैठकीचे आयोजन करून दिले.

आंदोलकांच्या प्रमुख मागण्या सन २००६ ची दफ्तर दिरंगाई कायद्याची अंबल बजावणी करावी., विद्यार्थी महिला वृद्ध यांचा प्रवास सुलभ व्हावा या साठी खेड आगरात नविन एस.टी गाड्यांची संख्या वाढवावी., खेड तालुक्यातील खड्डेमुक्त रस्त्याचे काम साईड पट्ट्यांसह लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे., साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक राजगुरुनगर शहरात उभारावे., कलम १५५ खाली दुरुस्तीसाठी आलेले अर्ज मुदतीत निकाली काढण्यात यावे. व शेतकऱ्यांना नाहक त्रास होवु नये., खेड तालुक्यातील गावोगावी जलजीवन मिशनचे अपूर्ण काम त्वरित पूर्ण करण्यात यावे. तसेच ज्या ठेकेदारानी मुदतीत काम केले नाही. त्यांचे परवाने रद्द करुन त्यांचेवर करवाई करण्यात यावी., तहसील कार्यालय खेड येथे येणाऱ्या सर्व नागरिकांसाठी सुलभ शौचालय बांधण्यात यावे., मिटर रीडिंग न घेता विज बिल देणे बंद झाले पाहिजे. व विज पुरवठा सातत्याने खंडित होने हे बंद होऊन सुरळीत विज पुरावठा झाला पाहिजे. तसेच शेतकऱ्यांना वाढीव विज बिल देऊन त्यांचे मानसिक आर्थिक शारिरिक शोषण करणाऱ्या तसेच कर्तव्यात कसुर करणाऱ्या महाराष्ट्र राज्य महावितरण विज कंपनीच्या खेड तालुक्यातील अधिकाऱ्यांवर कारवाई करणे बाबत., विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी खेड ते पुणे स्टेशन पर्यंत थेट बस सेवा उपलब्ध करून देणे, खेड तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी वाळद पूल मार्गे वर्तुळाकार एसटी बस सेवा पुन्हा कायमस्वरूपी चालू करण्यात यावी. या प्रमाणे असून या आंदोलनाला राजेजी गुजर प्रतिष्ठानच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.

यावेळी हरेश देखणे, किसन गोपाळे, रज्जाक शेख, दिलीप पालवे, तुषार गायकवाड, प्रमोद खोब्रागडे, विकास शिंदे, स्वप्निल गायकवाड, हेमंत विरकर, सत्यवान शिंदे, इमरान शेख, सचिन देखणे, सागर शिंदे, वजरा लोखंडे, रजनी गायकवाड, ज्योती गवालवाड इत्यादी उपस्थित होते. या आंदोलनाचे आयोजन रिपब्लिकन कष्टकरी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तुषार गायकवाड व खेड तालुका संपर्कप्रमुख विकास शिंदे यांनी केले होते.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# १०० ग्रॅम खिचडीत कसं भरणार पोट?

## पंढरीत पूरग्रस्तांचे होतायेत हाल




**पंढरपूर** : उजनी आणि वीर धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे पंढरपूर शहराला पुराचा वेढा निर्माण झाला आहे. पंढरपूर शहरांमध्ये नदीकाठच्या गावाला आणि झोपडपट्टीमध्ये पूर जन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरातील अंबिकानगर झोपडपट्टी, व्यसनारायण झोपडपट्टी या भागातील ७८ कुटुंबाचे ६५ एकर आणि उपजिल्हा रुग्णालय समोर स्थलांतर करण्यात आले आहे. मात्र या नागरिकांसाठी देण्यात येणारा मूलभूत गरज म्हणून अन्न देण्यामध्ये महसूल प्रशासनाला अपयश असल्याचे बोलले जात आहे. यामुळे महसूल प्रशासनाचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे.

पंढरपूर शहरातील व्यास नारायण झोपडपट्टी, अंबिकानगर झोपडपट्टी या भागातील अनेक कुटुंबे पुरामुळे स्थलांतरित झालेले आहेत. त्यांच्या घरामध्ये तसेच पत्र्याच्या शेडमध्ये पुराचे पाणी घुसले आहे. अनेकांनी घर सोडले आहे. तर अनेकांनी आपले सामान तसेच सोडून जीव वाचवण्यासाठी अहोरात्री स्थलांतर केले आहे. या सर्व स्थलांतरित नागरिकांची जीविताची आणि अन्न वस्त्र पुरवण्याची जबाबदारी महसूल प्रशासनाची असताना देखील त्यांच्या मूलभूत गरजा पुरवण्यामध्ये महसूल प्रशासनाला अपयश आले असल्याचे दस्तूर खुद्द रहिवाशांनीच व्यक्त केले आहे. महसूल प्रशासनाच्या वतीने या नागरिकांना योग्य प्रकारे अन्नपुरवठा व पाणी देणे गरजेचे असताना ते मिळाले नाही.

मंदिर समितीच्या वतीने लोकांना खाण्यासाठी भात दिला जातो मात्र तो भात आणि खिचडी कोरडी असल्यामुळे लोकांना खाताही येत नाही त्यासोबत कोणत्याही प्रकारचे वरण नाही किंवा चपाती नाही त्यामुळे या नागरिकांचे तसेच पूरग्रस्त भागातील बालकांचे पोटाचे हाल होत असून, वयोवृद्ध नागरिक व लहान मुलांची जेवणाची सोय होत नसल्यामुळे अनेक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. याबाबत पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा फोन बंद असल्याचे आढळून आले.

**महसूल प्रशासनाचा ढिसाळ कारभार**

एकंदरीतच पूरग्रस्त नागरिकांनी महसूल प्रशासनाच्या या ढिसाळ कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली असून, स्थानिक नगरसेवक विक्रम शिरसट आणि माजी नगराध्यक्ष लक्ष्मणभाऊ शिरसट हे चांगल्या प्रकारे आम्हाला अन्नपुरवठा करत होते. मात्र महसूल प्रशासनाने आमचे स्थलांतर केले, मात्र आम्हाला योग्य प्रकारे अन्नपुरवठा केला नाही. खाण्यायोग्य नसलेले अन्न आम्हाला पुरविले. त्यामुळे आम्हाला त्रास होऊ लागला. आम्हाला ते अन्न खाताही येत नव्हते. अधिकारी आणि कर्मचारी तुम्ही तरी तुमच्या घरच्या लोकांना असे अन्न द्याल का..? असा सवाल पूरग्रस्त नागरिकांनी केला आहे. तुमच्या मुलाबाळांना असे अन्न खाऊ घालाल का..? असे अनेक प्रश्न बाधित पूरग्रस्त नागरिकांनी आणि महिलांनी व्यक्त केले आहे. यामुळेच पंढरपुरातील महसूल प्रशासनाचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

# पाल येथे श्री गुरुदेव दत्त मूर्ति प्रतिष्ठापना भक्तिरसात संपन्न




**सातारा** : पाल ता. कराड येथे श्री गुरुदेव दत्त महाराजांच्या मंदिराच्या जीर्णोद्धार व मूर्ति प्रतिष्ठापना सोहळा भक्ती पूर्ण वातावरणात व उत्साहात संपन्न झाला. पू. योगश्री शरदभाऊ जोशी महाराज, पू. देविदास जोशी महाराज, आणि डॉ. निळकंठ धारेश्वर महाराज यांच्या हस्ते श्री दत्त मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या संतांनी आपल्या अध्यात्मिक शक्तीने आणि मंत्रशक्तीने या मंदिर व परिसरातील वातावरण किती रसाने चिंब केले.

या सोहळ्याच्या निमित्ताने, मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विविध धार्मिक विधींनी मंदिरातील व परिसरातील वातावरण अधिक पावन बनले.

या सोहळ्याला आ. बाळासाहेब पाटील माजी खासदार श्रीनिवास पाटील उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात या सोहळ्याचे महत्त्व सांगून, मंदिराच्या पुनर्बांधणीमागील मेहनत आणि श्रद्धेला गौरवले. या वेली देवराज पाटील यांनी गावाच्या विकासाच्या वाटचालीचे महत्व व सदर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी लोकानी केलेली मेहनत या बद्दल गौरव केला व भक्तांना एकात्मतेचा संदेश दिला.

सोहळ्याच्या शेवटी, महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. जीर्णोध्दार प्रसंगी ग्रामस्थांनी एकत्र येऊन गुरुदेव दत्त महाराजांच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण केली.

# राजगुरुनगरमध्ये गोकुळ अष्टमी व श्री समर्थ पंत महाराज (बाळेकुंद्री) यांचा जन्मोत्सव उत्साहात



**राजगुरुनगर** : राजगुरुनगर येथील भीमानदी तीरावरील दत्त मंदिरात श्री दत्त विश्वस्त मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे याही वर्षी गोकुळ अष्टमी व श्री समर्थ पंत महाराज (बाळेकुंद्री) यांच्या जन्मोत्सवाचे आयोजन सोमवार व मंगळवार (दि. २६ व २७ ऑगस्ट ) रोजी करण्यात आले होते.

यानिमित्त सोमवार (दि .२६) रोजी सकाळी अभिषेक व महापूजा यजमान हनुमंत सैद यांचे नातू या उभयतांच्या हस्ते करुन उत्सवास सुरुवात झाली. दुपारी श्री दत्त विश्वस्त मंडळाचे भजन, जप, ओम नमः शिवाय नामाचा जयघोष व सायंकाळी ६.०० वाजता ह. भ. प. विठ्ठल महाराज गुंडाळ यांच्या प्रवचन रुपी सेवेनंतर भक्त मंडळींच्या उपस्थितीमध्ये जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी महिलांनी पाळणा म्हटला. तदनंतर हरी जागर, आरती व सुंठवडा प्रसाद वाटप करण्यात आला. दुसऱ्या दिवशी मंगळवार ( दि. २७) रोजी दुपारी श्री दत्त विश्वस्त मंडळाचे भजन होवून श्रींची आरती आणि परंपरेनुसार संदीप वाडेकर यांचे हस्ते प्रसाद वाटपाने उत्सवाची सांगता झाली.

उत्सवाच्या कार्यक्रमाचे संयोजन मंडळाचे अध्यक्ष समीर प्रताप आहेर, हनुमंत सैद, प्रकाश तेंडोलकर, प्रभाकर जाधव, पांडुरंग साळुंके, नथुराम तनपुरे, रविंद्र सांडभोर, माणिक तनपुरे, भीमाशंकर तारू, प्रवीण शेटे, मनोहर तारू, अजित डोळस, नारायण जाधव, शिवाजी सावंत, मंदार पिसाळ, शरद चोपडे, राहुल पिंगळे, धनंजय लाखे, लक्ष्मण कहाणे, कमल पिसाळ, जनाबाई सैद, जयश्री आमडेकर, सुनंदा दहितुले, सुनील सैद आदी गुरू बंधू- भगिनींच्या सहकार्याने करण्यात आले होते.

# जितेश अंतापूरकर यांचा भारतीय जनता पार्टीत प्रवेश

**नांदेड** : नांदेड जिल्ह्यातील देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलेले जितेश अंतापूरकर यांनी शुक्रवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्री. अंतापूरकर यांचे स्वागत केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खा. अशोक चव्हाण, माजी खा.प्रताप पाटील चिखलीकर, आ. तुषार राठोड, ज्येष्ठ नेते राम पाटील रातोळीकर, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, विक्रांत पाटील आदी यावेळी उपस्थित होते. श्री. अंतापूरकर यांच्या प्रवेशामुळे नांदेड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टी आणखी मजबूत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की लोकसभा निवडणुकीत नांदेड मतदारसंघात भाजपाचा थोडक्यात पराभव झाला. आता नांदेड जिल्ह्यातील परिस्थिती बदलली आहे. विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यात महायुतीला सर्वाधिक जागा मिळतील. श्री अंतापुरकर यांच्या पाठीशी पक्ष खंबीरपणे उभा राहिल, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

ज्येष्ठ नेते खा. अशोक चव्हाण म्हणाले की, अंतापूरकर यांना काँग्रेसमध्ये अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे त्यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या निर्णयाचा भाजपाला फायदा होईल.

श्री.अंतापूरकर म्हणाले की पक्षाकडून जी जबाबदारी सोपविली जाईल ती आपण निष्ठेने पार पाडू. श्री.अंतापूरकर यांनी शुक्रवारी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला. देगलूर – बिलोली विधानसभा मतदारसंघातील अनेक जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांनी, माजी नगराध्यक्षांनी यावेळी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

# शब्द फसवे असतात पण स्पर्श नाही : रमजान शेख



**तासगाव** : शब्द फसवे असतात पण स्पर्श फसवा नसतो, पालकांनी मुलीना चांगला व वाईट स्पर्श कसे समजावून सांगायचे या बाबत मार्गदर्श करताना ते म्हणाले .पालकांनी लहानपणापासूनच मुलांना चांगला आणि वाईट स्पर्श यातील फरक शिकवने गरजेचे आहे. असे मत रमजान शेख यांनी व्यक्त केले. ओळख स्पर्शाची या विषयावर जिल्हा परिषद मराठी मुलींची शाळा नंबर दोन येते पालक सभेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मार्गदर्शक रमजान शेख हे होते.

आपल्या मार्गदर्शन पर व्याख्यनात शेख म्हणाले मुलांसाठी, अयोग्य वर्तन ओळखण्यासाठी चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श जाणून घेणे खूप महत्वाचे आहे. जेव्हा पालक त्यांच्या मुलांशी मुक्त संवाद साधू लागतात, तेव्हा ते मुलांना काहीही शेअर करण्यास आणि चर्चा करण्यास सोयीस्कर वाटण्यास मदत करते. मुलांसाठी घरी आरामदायक वातावरण तयार केल्याने पालकांना त्यांच्या मुलांबद्दल अधिक जाणून घेण्यास मदत होते.

चांगले आणि वाईट स्पर्श या संकल्पनेचे सखोल आकलन मुलांना प्रत्येकासाठी मर्यादा किंवा सीमा निर्माण करण्यास अनुमती देते. कोणता स्पर्श स्वीकार्य आहे किंवा अस्वीकार्य यात फरक करण्यात मुले सक्षम होतील. मुलांसोबत जर अश्या घटना घडल्या तर त्यांना या विषयावर कोणाशीही अगदी त्यांच्या पालकांशी चर्चा करताना अस्वस्थ वाटते. म्हणून, पालकांनी मुलांशी निरोगी संवाद सत्रांना प्रोत्साहन दिले पाहिजे, ज्यामुळे मुलांना त्यांच्यासोबत घडलेले प्रत्येक चांगले व वाईट अनुभव उघड करण्यास सोयीस्कर वाटेल. मुलांना चांगल्या आणि वाईट स्पर्शाविषयी शिकवल्याने त्यांना शरीराची संमती किती महत्त्वाची आहे हे समजते. आणि त्यांना कोण स्पर्श करू शकतो हे ते शिकतात. पालकांनीही मुलांशी मित्रांसारखे वागले पाहिजे.

फेसबुक, व्हॉट्सप, इंस्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरताना विद्यार्थ्यांनी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. आपले मुल सोशल मिडीयावर काय पोस्ट करते यावर पालकांनी लक्ष द्यायला हवे .जर अशी घटना घडली तर १०९८ हेल्पलाईन ,चाईल्ड लाईनची आपण कश्या प्रकारे मदत घेऊ शकतो या बाबत मार्गदर्शन केले. शाळा व्यवस्थापन समितीच्या

मंगल पवार,मिनाज व्हनवाड ,सुजाता नागजे, तेजस्विनी माळी उपस्थित होत्या .मिनाज व्हनवाड म्हणाल्या आई वडील दोघांनीही मुलाना एकत्र बसून चांगला व वाईट स्पर्श या मधील फरक समजावून सांगणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे नियोजन शाळे मार्फत करण्यात केले सूत्रसंचालन शिक्षिका सुनीता गोरवे व आभार अभिजित लांडगे सर यांनी केले कल्पना धनवडे ,शुभदा कांबळे ,भक्ती प्रिया कांबळे ,सीमा पाटील ,यशोदीप माने शिक्षक उपस्थित होते.

# डॉ. टी.व्ही. सोमनाथन यांनी नवे कॅबिनेट सचिव म्हणून पदभार स्वीकारला

**मुंबइ** : राजीव गौबा यांच्या सेवानिवृत्तीनंतर डॉ. टी.व्ही. सोमनाथन यांनी आज केंद्र सरकारमध्ये नवे कॅबिनेट सचिव म्हणून पदभार स्वीकारला. डॉ. सोमनाथन हे तामिळनाडू केडरचे (१९८७ ची तुकडी ) भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांनी कलकत्ता विद्यापीठातून अर्थशास्त्रात पीएच.डी. मिळवली आहे. तसेच हार्वर्ड बिझनेस स्कूलचा एक्झिक्युटिव्ह डेव्हलपमेंट प्रोग्राम देखील पूर्ण केला असून ते चार्टर्ड अकाउंटंट, कॉस्ट अकाउंटंट आणि कंपनी सेक्रेटरी देखील आहेत.

डॉ. सोमनाथन यांनी केंद्रात पंतप्रधान कार्यालयात अतिरिक्त सचिव आणि सहसचिव अशी महत्त्वाची जबाबदारी सांभाळली आहे. त्यांनी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयात सहसचिव म्हणूनही काम केले तसेच वॉशिंग्टन डीसी मधील जागतिक बँक येथे संचालक म्हणून काम केले आहे.

# महावितरणचा ट्रान्सफॉर्मर ठेकेदाराकडून परस्पर स्थलांतर

**तासगांव महावितरण मधील प्रकार ; मनसेच्या निवेदनानंतर चौकशीचें आदेश.**



**तासगाव** : माळवाडी, ता. पलूस येथील एका जागेवरील ट्रान्सफॉर्मर शासनाची कोणतीही परवानगी न घेता एका जागेवरुन दुसर्या जागी अनाधिकृतपणे स्थलांतर करण्याचा गंभीर प्रकार घडला आहे. याप्रकरणी मनसेचे जिल्हा संघटक अमोल काळे यांनी आवाज उठवल्यानंतर महावितरणकडून याची पाहणी करण्यात आली. यावेळी महावितरणच्या लक्षात हा धक्कादायक प्रकार आला. याप्रकरणी पुढील कारवाईसाठी कोल्हापूर महावितरण मुख्य अभियंता यांना पत्रव्यवहार करण्यात आल्याचे अधिक्षक अभियंता यांनी पत्रात म्हटलेआहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तासगाव तालुक्यातील संबंधीत ठेकेदार हा समर्थ इलेक्ट्रीकल्स नावाने महावितरण मध्ये काम करत आहे. तासगाव महावितरणमधील अनेक कामे याच्या कार्यालयातून होत असतात. यासाठी येथील अधिकारी नागरीकांना संबंधीत ठेकेदाराची भेट घेण्यासाठी पाठवत असतात. अशी तक्रार मनसेकडे आली होती.

यानंतर माहिती घेतली असता संबंधीत ठेकेदार महावितरण विभागातील अनेक कामे अनाधिकृत करुन लोकांची फसवणूक करत असल्याचे दिसून आले. तर याचशिवाय अधिकार्यांना हाताशी धरुन त्याने अनेक साहित्य जुने वापरुन त्याची बिले मात्र नवीन साहित्याप्रमाणे काढली आहेत. तर माळवाडी येथील एक ट्रान्सफॉर्मर शासनाची कोणतीही परवानगी न घेता एका जागेवरुन दुसर्या जागी स्थलांतरीत केला आहे.

याबाबत मनसेच्या तक्रारीनंतर अधिक्षक अभियंता यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले. यावेळी या ठेकेदाराने शासनाची कोणतीही परवानगी न घेता हा प्रकार केल्याचे दिसून आले.

याप्रकरणी संबंधीत ठेकेदाराचा परवाना रद्द करुन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन करु, असा इशारा काळे यांनी दिला आहे.

दरम्यान महावितरणकडून संबंधीत ठेकेदाराला विचारणा केली असता राजकीय दबाव व महावितरण कंपनीकडून परवानगी मिळण्यापूर्वी काम करण्याबाबत दबाव आल्याने काम केले असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान काळे म्हणाले, संबंधीत ठेकेदाराने महावितरण विभागामध्ये अधिकार्यांना हाताशी धरुन अनेक गैरप्रकार केले आहेत. यासाठी त्याने अनेक अधिकार्यांना अलिशान चारचाकी गाड्या, परदेश सहली दिल्या आहेत. तर यातून त्याने मिळवलेल्या पैश्यातून पेट्रोल पंप, जमिनी, सोने, बंगला अशी माया गोळा केली आहे.

संबंधित ठेकेदाराने केलेले काम अनधिकृत आहे. सदर ट्रान्सफॉर्मर ऊर्जान्वित करण्याची कोणतीही परवानगी या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या नव्हती. त्यामुळे संबधित ठेकेदारावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

# स्वराज्य फाउंडेशन तासगाव क्रीडा दिन उत्साहात



तासगाव : २९ ऑगस्ट रोजी स्वराज्य फाउंडेशन च्या वतीने क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन स्वराज्य फाउंडेशनचे अध्यक्ष किरण माने संचालक राजेंद्र चव्हाण, वसंतराव थोरबोले प्रशिक्षक अंकुश कलकुटगी सर ,अक्षय ठोंबरे डॉक्टर सचिन सूर्यवंशी सर ,पालक संग्राम पाटील महिला पालक पवार मॅडम ,शिंत्रे मॅडम व जमादार मॅडम उपस्थित होत्या.

अध्यक्ष किरण माने यांनी हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या कार्याची ओळख फाउंडेशनच्या खेळाडूंना करून दिली. खेळाविषयी एकनिष्ठ व प्रामाणिक राहण्याची प्रतिज्ञा खेळाडूंनी घेतली.

# विराज शिंदे यांना योग्यवेळी त्यांची जागा दाखवुन देऊ : मोहनराव जाधव

**वाई** : निवडणुका जवळ आल्या की आमदार मकरंदआबा पाटील व खासदार नितिनकाका पाटील यांच्यावर टिका केली, आपण त्यांच्याएवढे मोठे होतो. असे जर कोणाला वाटत असेल अशा अर्विभावात कोणीही राहु नये. शेतकऱ्यांची व जनतेचा कळवळा कोणाला आहे व कोणाला नाही, हे जनतेला माहित आहे. त्यामुळे प्रसारमाध्यमातून काही विपर्यास्त बातम्या प्रसिद्ध केल्या की आपली राजकीय उंची वाढेल असे जर कोणाला वाटत असेल तर त्यांनी निवडणुकीद्वारे सामोरे यावे. मग जनता त्या अतिमहत्वाकांक्षी विराजला त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही. ज्या पद्धतीने मकरंदआबांना पक्षाने तिकिट दिले नव्हते व अपक्ष लढले तसे या महाभागांनी लढावे आणि मगच आमच्या नेत्यावर बोलावे असा इशारा वाई बाजार समितीचे सभापती मोहनराव जाधव यांनी स्वतःला नेता म्हणवुन घेणाऱ्या विराज शिंदे यांना दिला आहे.

मोहनराव जाधव पुढे म्हणाले की, खासदार नितीनकाका पाटील व आमदार मकरंदआबा पाटील यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरूवात गावच्या सरपंचपदापासुन केलेली आहे. त्यामुळे त्यांना सर्वसामान्य जनतेच्या सुख-दुः खांची जाणीव, त्यांच्याबद्दल कळवळा आहे. सर्वसामान्य जनतेची नाळ त्यांच्याशी जोडली गेलेली आहे. त्यामुळे स्व लक्ष्मणरावतात्यांच्याप्रमाणेच मकरंदआबा व नितीनकाका यांनी सर्वसामान्य जनतेच्या ह्रदयामध्ये स्थान निर्माण केलेले आहे. मदन भोसले यांच्याबाबत केलेले वक्तव्य हे आतापर्यंतच्या निवडणुकीत ते पाचवेळा पराभूत झालेले आहे.

त्यामुळे या वाक्याचा विपर्यास्त करण्याची कोणतीच गोष्ट नाही जे आहे खरंच बोललेले आहेत. ते आतापर्यंतच्या निवडणुकीत पाचवेळा पराभुत झालेले आहेतच, ही गोष्ट खरीच आहे. पण आपले काय आहे ते बघा. ज्यावेळेस आपले पिताश्री किसन वीर कारखान्यावर संचालक होते. त्यावेळेस आपल्यालाच कारखान्यावर मोर्चा काढावा लागलेला होता. यात किती कार्यकर्ते आपणांबरोबर होते हे जरा आठवत असेल तर आठवा आणि आपले निवेदन घ्यायलाही आपले पिताश्रीच आले होते, याच्यापेक्षा मोठे दुर्दैव काय असेल. त्यावेळी त्या निवेदनाचे पुढे काय झाले? याचा परत कधीच उल्लेख आपल्या तोंडातून आला नाही. याउलट स्व. लक्ष्मणरावतात्यांनी जे संस्कार आमदार मकरंदआबा व खासदार नितीनकाकांवर केलेले आहेत त्याचेच फलित आज दिसून येत आहे.

# स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून सर्वोच्च पदावर अधिकारी : डॉ.राजेंद्र पाटील

**कुरुंदवाड :** धनगर समाजने शैक्षणिक क्षेत्रात मोठी क्रांती केली आहे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून सर्वोच्च पदावर अधिकारी म्हणून कार्यरत झाले आहेत.हे निर्माण होणारे संस्कृतीक हॉलचा उपयोग सामाजिक कार्याबरोबरच स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्र म्हणून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मंदिर ठरेल असे प्रतिपादन आम-डॉ.राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी केले.

कुरुंदवाड येथील भैरववाडी उपनगरात श्री बिरदेव मंदिर येथे संस्कृतीक हॉलच्या पायाभरणी शुभारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमात आम-डॉ. पाटील यड्रावकर बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी खास निवेदिता माने होत्या. रुकडी बाळूमामा मठाचे संस्थापक शंकरराव देबाजे, माजी नगराध्यक्ष रामचंद्र डांगे, दादासाहेब पाटील, पालिकेचे अभियंता हणमंतराव मारनूर,प्रदीप बोरगे, चंद्रकांत जोंग आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी खास.माने म्हणाल्या धनगर समाजाचा राजकीय,सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रात आता मोठ्या प्रमाणात उत्कर्ष होऊ लागला आहे. आधुनिक युगात धार्मिक परंपरा कमी होऊ नये ही भावना आहे. समाजाच्या रूढी परंपरा जपण्यासाठी बिरदेव मंदिरात उभारण्यात येणारे सांस्कृतिक हॉल हे धार्मिक गोतावळा निर्माण करणारे आध्यात्मिक हॉल म्हणून नावारूपास येईल.



कुरुंदवाड येथे बिरदेव मंदिराच्या पायाभरणी शुभारंभ प्रसंगी कार्यक्रमात बोलताना आम.डॉ. पाटील-यड्रावकर,व्यासपीठावर माजी.खास.माने आदी.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते बिरदेव मंदिराच्या प्रांगणात सांस्कृतिक हॉलच्या पायाभरणीचा शुभारंभ करण्यात आला. स्वागत नगराध्यक्ष मनीषा डांगे यांनी केले तर प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष रामचंद्र डांगे यांनी केले. माजी उपनगराध्यक्ष रमेश भुजगडे,चंद्रकांत जोंग,किरणसिह जोंग,विठोबा कोळेकर,उमेश कर्णाळे,उदय डांगे,सचिन जोंग, आदींनी मनोगते व्यक्त केली. आभार रणजीत डांगे यांनी मानले.

यावेळी माजी नगराध्यक्ष अक्षय आलासे, किरण जोग बापूसो जोग दीपक गायकवाड, अजित देसाई, चंद्रकांत आलासे, चंद्रकांत कोळेकर, सुरेश गावडे, महादेव कोळेकर,राजेंद्र देवकाते, महादेव नाईक,, चंद्रकांत खटावे, कुबेर जोंग, सुरेश केरले, महादेव प्रधाने आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आडगाव येथील तलाठी हत्येचा साताऱ्यात तलाठी संघटनेकडून निषेध

## जिल्हा प्रशासनाला निवेदन, तलाठ्यांचे साताऱ्यात काम बंद आंदोलन

**सातारा :** मौजे आडगाव तालुका वसमत जिल्हा हिंगोली येथील तलाठी संतोष देवराम पवार यांची तलाठी कार्यालयांमध्ये हत्या करण्यात आली.

या घटनेचे तीव्र पडसाद महसूल विभागात उमटले आहेत . सातारा जिल्हा तलाठी संघटनेच्या वतीने जिल्हा प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले महाराष्ट्र राज्य संघटनेचे ज्ञानदेव डुबल, उपाध्यक्ष विठ्ठलराव सोडमिसे, जिल्हाध्यक्ष एल एल बामणे, चंद्रकांत पारवे इत्यादी सदस्य यावेळी उपस्थित होते

हे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांना सादर करण्यात आले . या निवेदनात नमूद आहे की महसूल विभागातील तलाठी जबाबदार पद आहे महाराष्ट्र सारख्या राज्यात एखाद्या सरकारी कार्यालयात कर्मचाऱ्याची हत्येची घटना घडते हे निंदनीय असून यामधील आरोपीची मानसिक विकृती दिसून येते.

सातारा जिल्हा तलाठी संघ या घटनेचा तीव्र निषेध करत आहे तलाठी संवर्गाला सातत्याने वेगवेगळ्या कारणावरून बदनाम केले जात आहे

या घटनेमुळे संतोष पवार यांचे कुटुंबीय उध्वस्त झाले आहे त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे तसेच तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षितता प्रश्न निर्माण झाला आहे या संदर्भात राज्य शासनाने ठोस उपाय योजना करावी यामुळे सातारा जिल्ह्यातील तलाठ्यांनी एक दिवस काम बंद आंदोलन केले. यामुळे महसूल विभागाचे कामकाज ठप्प झाले होते.

# पालिकेतील निकम्म्या अधिकाऱ्यांकडूनच फुकट्या जाहिरातबाजांना मिळतयं अभय

**सातारा :** सर्वसामान्य नागरिकांचा विषय समोर आला की कायदा व नियमांवर बोट ठेवायचं आणि ज्यांच्या डोक्यावर वरिष्ठ आणि राजकीय नेत्यांचा हात आहे अशा लोकांनी नियम धाब्यावर बसवले तरी त्याकडे दुर्लक्ष करायचं, असा सोईचा कारभार पालिकेत बसलेल्या निकम्म्या अधिकाऱ्यांकडून सुरू आहे. यामुळे पालिकेच्या आर्थिक उत्पन्नाला चुना लागतोय याशिवाय छत्रपतींच्या राजधानीतील नगरपालिकेच्या बोटचेप्या कारभाराचे सर्वत्र धिंडवडे निघत आहेत.




पालिकेतील या सोईच्या कारभाराविरोधात नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची भावना निर्माण झाली आहे. एकीकडे नियम धाब्यावर बसवत पालिकेच्या उत्पन्नाला चुना लावणाऱ्या आणि दुसरीकडे नगरसेवक होण्याची स्वप्न पाहणाऱ्यांना येत्या निवडणुकीत त्यांची लायकी दाखवू, अशी चर्चा नागरिकांमधून कानी पडत आहे.

स्वतःला राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि राजकीय नेत्यांचे आम्हीच खरेखुरे निष्ठावंत असल्याचा दिखावा करीत चमकोगिरी करणाऱ्यांचे संपूर्ण शहरात वारंवार विनापरवाना फ्लेक्स दिसतात. नियम व कायदा धाब्यावर बसवणाऱ्या अशा प्रवृत्तींमुळे नगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नाला चुना लागत आहे. अतिक्रमण विभागातील अधिकारी सर्वसामान्यांच्या बाबतीत कायद्यावर बोट ठेवतात. परंतु अशा फुकट्या प्रवृत्तींनी शहरात केलेल्या विनापरवाना फुकट्या जाहिरातींकडे कानाडोळा करून नियम पायदळी तुडवताना दिसतात. संबंधितांकडून दंड वसुली का केली जात नाही या प्रश्नावर ते निवडणुकीला आमच्याकडे येतीलच की असं बेजबाबदारपणाचं उत्तर देऊन मोकळे होतात. हा प्रकार गंभीर असून कायदा व नियमांची काटेकोर अंमलबजावणी न करता आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना आघाडीचे नेते कशी काय मोकळीक देतात, असा प्रश्न नागरिकांना पडलेला आहे.

# सातारा शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम उभारावे

## शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा प्रशासनाला निवेदन



**सातारा :** सातारा विधानसभा मतदारसंघांमध्ये सातारा व जावळी या कार्यक्षेत्रामध्ये या क्षेत्रातील गुणवंत खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचता यावे यासाठी ऑलम्पिक खेळांचा समावेश असणारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम उभारण्यात यावे अशी मागणी ठाकरे उबाठा गटाच्या वतीने जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली आहे .या शिवसेनेचे जिल्हा उपसंघटक सादिक बागवान आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी याबद्दलचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांना सादर केले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करताना सादिक बागवान म्हणाले जर कराड सारख्या तालुक्याला मागणी न करता स्टेडियमसाठी ७५ कोटीचा निधी येऊ शकतो तर सातारा शहरांमध्ये सुद्धा एक स्टेडियम आहे, त्याची दुरुस्ती मात्र होऊ शकत नाही आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा सातारा मतदारसंघात मिळत नसल्यामुळे येथे गुणवंत खेळाडू मागे पडतात राधिका रोडवरील शेती फार्म शाळेसमोरील मोकळ्या जागेमध्ये आंतरराष्ट्रीय खेळांचा समावेश असणारे आणि सुविधांनीयुक्त असे स्टेडियम उभारले जाऊ शकते त्यामुळे येथील नियोजित प्रांत व तहसीलदार कार्यालय अन्यत्र हलवावे.

जर राज्य शासनाने प्रगल्भ क्रिडा धोरणाचा स्वीकार केला आहे तर सुविधांच्या बाबतीमध्ये सातारा मागे का? असा प्रश्न निवेदनात विचारण्यात आला आहे यासंदर्भात निवेदन सादर केल्यानंतर सादिक बागवान यांनी पत्रकारांशी संवाद साधत याबाबत येत्या १५ सप्टेंबर पर्यंत जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून राज्य शासनाने आदेश द्यावेत अन्यथा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्टेडियम मागणीसाठी ठाकरे गटाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा बागवान यांनी दिला आहे.

# खोडजाईवाडीचा तलाव शंभर टक्के भरला



**मसूर :** कऱ्हाड तालुक्यातील मसूरच्या पूर्वेकडील खोडजाईवाडी (किवळ) नजीकचा तलाव संततधार पावसाने १०० टक्के भरला. सांडव्यावरून पाणी वहात असल्याने यावर्षीचा शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न संपुष्टात आला आहे. उन्हाळ्यात देखील पाण्याचा प्रश्न उद्भवणार नाही असा कयास बांधण्यात आला आहे.

खोडजाईवाडी व किवळ या दोन्ही गावांना वरदान असणारा तलाव हा ६५ एकरात आहे. या तलावात १३८५ सहस्त्र घनमीटर पाणीसाठा साचला आहे. या पाण्यामुळे किवळ, खोडजाईवाडीची एकूण १६४ हेक्टर जमीन ओलिताखाली येत आहे. यावर्षी झालेल्या तुफान पर्जन्यवृष्टीमुळे हा तलाव भरून सांडव्यावरून पाणी वाहत असल्याने खोडजाईवाडीसह किवळ गावातील पिण्याच्या, जनावरांच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. या तलावात २०१४ सालापासून पाणीसाठा चालू झाला आहे. गतवर्षी अत्यल्प झालेल्या पावसामुळे हा तलाव उन्हाळ्यात ठणठणीत कोरडा होता. त्यामुळे गावाला दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागला होता. शासनाच्यावतीने टँकर सुरू करून पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. पाणी नसल्याने ग्रामस्थांचे जीवन विस्कळीत झाले होते.

या गावामध्ये शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे गावच्या लोकसंख्येपेक्षा जनावरांची संख्या जास्त प्रमाणात आहे. या गावाला पाझर तलावा व्यतिरिक्त दुसरे कोणतेही पाण्याचं स्तोत्र उपलब्ध नसल्याने संपूर्णता निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागते. यावर्षीच्या झालेल्या पावसामुळे पाण्याचा प्रश्न निकाली निघाल्याने दोन्ही गावे समाधानी आहेत.

यावर्षी झालेल्या संततधार पावसाने होळजळवाडी खोडजाईवाडी गावची तहान भागवणारा तलाव १०० टक्के भरल्याने निसर्गाने गावावर गतवर्षी पडलेल्या भयावह दुष्काळाचे सावट दूर केले आहे. निसर्गाच्या कृपेने गावातील ग्रामस्थ, महिला युवकांनी यावर्षीसाठी पाण्यापासून सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# कुरुंदवाड ग्रामीण बिअर बार परमिट रूम असोसिएशनच्या अध्यक्षपदी अनुप मधाळे तर सचिव पदी उदय पाटील



**कुरूंदवाड :** मजरेवाडी कुरुंदवाड रस्त्यावर नजीक असणाऱ्या आशीर्वाद बिअर बार परमिट येथे येथे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या कुरुंदवाड ग्रामीण बार असोसिएशन ची बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये कुरुंदवाड ग्रामीण बार व परमिट रूम असोसिएशनच्या अध्यक्षपदी माजी नगरसेवक युवा नेते अनुप मधाळे यांची तर सचिव म्हणून उदय पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली यामध्ये सहा उपाध्यक्ष, एक खजिनदार यांचा समावेश आहे

परमिट रूम बियर बार चालवताना येणाऱ्या अडचणी, शासनासह संबंधित खात्याने लाभलेल्या जाचक अटी, तर इतरांच्या कडून वारंवार होणारा नाहक त्रास यावर सांगोपांग चर्चा करण्यात येऊन आगामी काळात येणाऱ्या समस्यांना एकत्रितपणे सोडविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्याचा आला यावेळी कुरुंदवाड ग्रामीण परमिट रूम व बियर बार असोसिएशनची कार्यकारणी जाहीर करण्यात आली .

अध्यक्ष अनुप रामदास मधाळे उपाध्यक्ष बापूसो कोळी टाकळीवाडी बबन खोत लाटवाडी दीपक गावडे कवठे गु लंद अरुण खडके शिरोळ राकेश जमदाडे कुरुंदवाड अभिषेक बंडगर कुरुंदवाड खजिनदार सागर चव्हाण, सदस्य : रमेश कुंभार अक्षय जाधव सचिन जगताप कवठे गुलंद शाहिद मुजावर मिलिंद लाड शेडशाळ निलेश बनणे जयवंत मंगसुळे सचिन भोसले ऋषिकेश शिंदे गौरवाड सागर आंबूपे योगेश पाटील अभिषेक बंडगर सागर आंबोपे कुरुंदवाड सुसम गायकवाड रोहिदास अभिनंदन घोडके कृष्णा चव्हाण तेरवाड अभिजीत मस्के सुमंत शिरढोणे किरणा आलासे अमोल घोडके मनोज शिंदे हेरवाड दौलत माने अनिल पाटील शुभम खतार सुनील पाटील दत्तवाड सचिन गावडे उत्तम कांबळे आलास शंकर कोळी विठ्ठल गोरे रणजीत पाटील बापू कोळी सुरज पाटील टाकळी अजिंक्य नरोटे अमोल कागले मजरेवाडी शिवराज तासगाव दानवाड.

# मतदारसंघात निधी देण्याचा कायदेशीर अधिकार माझाच : आ. बाळासाहेब पाटील

## भूकंप,स्थानिक ,जिल्हा नियोजन निधीतून विविध विकासकामे राबवली

**उंब्रज :** मी कराड उत्तरचा आमदार आहे कायद्यानुसार निधी देण्याचा अधिकार माझा आहे. भूकंप, स्थानिक ,जिल्हा नियोजन निधीतून विविध विकासकामे गेल्या पंचवीस वर्षात कराड उत्तरमध्ये राबवली आहेत. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांचा कराड उत्तर मतदारसंघ आहे.पिढी बदलत असते परंतु विचार कधीही बदलत नाही आजही कराड उत्तरची जनता माझ्या बरोबर आहे. कुणीही कुठेही गेलेले नाही माजी खा.श्रीनिवास पाटील साहेबांनी सांगितलेला एक गमतीशीर किस्सा मला सध्या कायमच आठवतो गावात पोलीस आले की संशयित किंवा ज्याचं काही घेणं देणं नसतो असा व्यक्ती पोलिसांनी माझं नाव घेतलं का असे ग्रामस्थांना विचारत असे कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात अशीच परिस्थिती निर्माण झाली असून आम्ही मतदारसंघात कुठेही गेलो की विरोधक आमची चौकशी करीत असतात आमच्याबद्दल काही बोलले का परंतु आम्ही कोणाचीच चौकशी करीत नाही अशी बोचरी टीका आ.बाळासाहेब पाटील यांनी लोकमान्य विकास सेवा सोसायटीच्या नूतन इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी नाव न घेता महायुतीच्या नेत्यांवर केली.



यावेळी कराड उत्तरचे आ. बाळासाहेब पाटील, माजी सभापती देवराज पाटील, मानसिंगराव जगदाळे, प्रणव ताटे, सुधाकर जाधव, हंबीरराव जाधव, सुधीर जाधव (काका), जयंत जाधव, लोकमान्य सोसायटीचे चेअरमन विनोद उर्फ सोमनाथ जाधव व सर्व संचालक मंडळ तसेच पंचक्रोशीतील सर्व सभासद व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. बुधवार दि.२८ रोजी सायंकाळी पाच वाजनेच्या सुमारस उंब्रज येथील मार्केट यार्डात सदरचा कार्यक्रम पार पडला.

यावेळी बोलताना आ.बाळासाहेब पाटील यांनी विरोधकांचा शेलक्या शब्दात खरपूस समाचार घेतला कोणीही कुठेही गेलेले नाही असे सांगत पुढील बेरजेचे राजकारण कसे असणार याची चुणूक दाखवली असून कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात झालेल्या कामाची यादीच वाचून दाखवली लोकमान्य सोसायटीची इमारत पंचक्रोशीत दिशादर्शक ठरणार असून चेअरमन विनोद उर्फ सोमनाथ जाधव तसेच सर्व संचालक मंडळाचे कौतुकही केले तोट्यातील संस्था फायद्यात आणून सभासदांना न्याय मिळवून दिला आहे असेही गौरवोद्गार यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धरपडे यांनी तर प्रास्ताविक चेअरमन विनोद उर्फ सोमनाथ जाधव यांनी केले तर मनोगत मानसिंगराव जगदाळे,देवराज पाटील यांनी व्यक्त केले सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत सोसायटीच्या वतीने करण्यात आले असून आभार व्हाईस चेअरमन शशिकांत थोरात यांनी मांडले याप्रसंगी नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने मोठी केली होती

मोजक्याच शब्दात शालजोडे

लाडकी बहिण योजनेला आम्ही कधीच विरोध केला नाही परंतु मस्तीत वागणे बरे नव्हे असा सल्ला सत्ताधारी विरोधकांना देताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे कोकणात झालेल्या नुकसानीबाबत राज्य सरकारच्या धोरणावर कराड तालुक्यातील उभारण्यात आलेल्या विविध पुतळ्यांचा इतिहास यावेळी आ.पाटील यांनी सांगितला कोणताही पुतळा उभारत असताना अवलंबली जाणारी नियमावली आणि कोकणात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करताना झालेली घाई यामध्ये मोठी तफावत असल्याचे प्रतिपादन यावेळी केले.